# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/01/2024 (मंगळवार) दुपार

---

### खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोस्टे अरोली:–** अंतर्गत १५ किमी अंतरावर मौजा खात येथे दिनांक ०१/०१/२०२४ चे १८.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– तुकाराम वातु केळवदे, वय ३५ वर्ष, रा. खात हा गावो गावी जाउन मुरमुरे विकण्याचे काम करतो फिर्यादीचे घराचे काही अंतरावर फिर्यादीची मामी नामे– गं. भा. छबिबाई दुर्योधन बागडे यांची इंदिरा गांधी चौक खात येथे भजे नाश्त्याची दुकान आहे. फिर्यादीचे मामीचे डोळयाचे ऑपरेशन झाल्याने मागील १० दिवसा पासुन त्याची भजे नाश्त्याची दुकाण फिर्यादी चालवित असुन फिर्यादीचे गावात राज उर्फ अनिल कैलास कुमार हा राहत असुन त्याला फिर्यादी ओळखतो. दिनांक ०१/०१/२०२४ रोजी सायंकाळी ०६/०० वा. सुमारास फिर्यादी भजे नाश्त्याचे दुकाण चालवित असतांना तेव्हा सुरेंद्र नामदेव देवतारे व अभिमन मांढरे हे दोघेही फिर्यादीचे नास्त्याचे दुकाणात आले व फिर्यादी कडुन फिंगर घेवुन खात होते तेवढ्यातच **आरोपी नामे– राज उर्फ अनिल कैलास कुमार** हा आला व फिर्यादी याला म्हणाला की, मला दारु पिण्याकरीता ५०/–रु दे तेव्हा फिर्यादी त्याला म्हटले की, मी तुला कशाला पैसे देऊ असे म्हटले असता त्यानी फिर्यादी सोबत वाद विवाद घातला. तु मला पैसे दिले नाही तर तुला जिवानी मारुन टाकीन असे राज उर्फ अनिल कैलास कुमार याने म्हणुन त्यानी त्याचे पॅन्टचे खिशातुन कोणते तरी धारधार वस्तु काढुन फिर्यादीचे डाव्या हाताचे खांद्यावर तसेच पोटावर, छातीवर मारुन जिव घेण्याचा ईराद्याने गंभीर जखमी केले. तेवढ्यातच फिर्यादीची पत्नी सौ. पुजा केळवदे ही आली व राज उर्फ अनिल कैलास कुमार याला तु माझ्या पतीला कशाला मारत आहे असे म्हणुन त्याला बाजुला केले. त्यानंतर राज उर्फ अनिल कैलास कुमार हा तिथुन निघुन गेला. त्यानंतर फिर्यादीला उपचारा करीता चुलत भाऊ संदिप सुभाष केळवदे, बहीण मंदा देवराव मांढरे यांनी सरकारी दवाखाना खात येथे आणले त्या ठिकाणी फिर्यादीचा प्रथम उपचार करुन तेथुन सरकारी दवाखाना भंडारा येथे रेफर केले. वार्ड क्र. १४ जिल्हा सामान्य रुग्णालय भंडारा येथे फिर्यादीचा उपचार सुरु आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३०७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी स.पो.नि. निशांत फुलेकर पोस्टे अरोली यांनी भेट दिली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास स.पो.नि. निशांत फुलेकर मो. नं. ७५८८५६४३०० हे करीत आहे.

### गळयातील सोन्याची पोत चोरी

**पोस्टे एमआयडीसी बोरी :–** अंतर्गत मौजा विक्तुबाबा देवस्थान टाकळघाट येथे दिनांक ०१/०१/२०२४ चे १३.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. शिला रजनिकांत माटे, वय ५७ वर्ष रा. प्लॉट नं. ७८४ घर नं. १३४ चंद्रमनी बुध्दपाली विहार बुध्दनगर नागपूर हे विक्तुबाबा देवस्थान येथे दर्शनाकरीता आले असता देवस्थानाच्या परिसरातुन त्यांच्या गळयातील सोन्याची पोत किंमती ९१०००/– रूपये कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार काळे मो. नं. ८४५९८८९१०६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर